**डॉ. अविनाश ढाकणे,** भाप्रसे
सदस्य सचिव

**Dr. Avinash Dhakne,** IAS
Member Secretary

MAHARASHTRA
"Your Service is our Duty"

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

मप्रनि/सक्ष/22 दिनांक : १२/०८/२०२४

विषय : या वर्षीच्या गणेशोत्सवात कृत्रिम तलावातील विसर्जित मातीचा पुर्नवापर करणेबाबत.

महोदय,

पर्यावरणपूरक गणेशोत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जावा याकरीता राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या संकल्पनेतून विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. पर्यावरणपूरक उत्सवाला विशेष चालना दिली जावी याकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत पर्यावरणपूरक मुर्तीकारांना शाडूच्या मातीची विनामुल्य उपलब्धता, प्रदर्शनासाठी जागेची उपलब्धता याकरीता मा. मुख्यमंत्री महोदय यांनी यापुर्वीच निर्देश दिलेले आहेत.

या वर्षीचा उत्सव अधिक परिणामकारक व पर्यावरणपूरक साजरा केला जावा याकरीता म.प्र.नि.मंडळाने "इको बाप्पा" हे मोबाईल ॲप कार्यरत केले असून या ॲपद्वारे सर्वसामान्य नागरिकांना पर्यावरणपूरक मुर्तीकारांचे ठिकाण, पर्यावरणपूरक आभूषण व साहित्यांची माहिती व त्यांना थेट संपर्क साधणे शक्य होणार आहे. याकरीता आपल्या कार्यक्षेत्रातील पर्यावरणपूरक मुर्तीकार, सजावट, आभूषणे तयार करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था यांची माहिती गुगल मॅपसहित या ॲपसाठी उपलब्ध करून दयावी अशी विनंती आहे. सदरहू माहिती pro@mpcb.gov.in या ई-मेल वर पाठविण्यात यावी.

त्याचबरोबर कृत्रिम तलावात विसर्जित केलेल्या मुर्तीच्या मातीचा पुर्नवापर करण्यासाठी काही सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला असून पुनरावर्तन या संकल्पनेतून विसर्जनानंतर शाडूची माती एकत्र गोळा करून तीच माती मुर्तीकारांना मुर्ती तयार करण्यासाठी विनामुल्य उपलब्ध करून दिली जात आहे. या पुर्वी या उपक्रमास पुणे, पिंपरी चिंचवड, ठाणे या महानगरपालिका क्षेत्रात चांगला प्रतिसाद मिळाला आहे.आपण देखील या वर्षी या संकल्पनेत सहभागी होऊन जास्तीत जास्त माती संकलन करून मुर्तीकारांना पुर्नवापरासाठी विनामुल्य उपलब्ध करून दयावी अशी विनंती आहे. पुनरावर्तन या संकल्पनेची संपुर्ण माहितीwww.punaravartan.org यावर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी punaravartan@gmail.com आपण या ई-मेल वर संपर्क साधू शकता.

(अविनाश ढाकणे)
डॉ. अविनाश ढाकणे

प्रति:
मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका,
मा. मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/नगरपंचायत.

**कल्पतरु पॉईंट, शीव सर्कल, शीव (पूर्व), मुंबई - ४०० ०२२. (फो.: २४०१ ०७०६)**
Kalpataru Point, Sion Circle, Sion (East), Mumbai - 400 022. (M. 2401 0706)
E-mail : ms@mpcb.gov.in • Website : www.mpcb.gov.in

Scanned with OKEN Scanner